CNRNOMHSI04-000731-2017

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ शैलेंद्र शिवाजी गावडे यांचा उलटतपास</u>**

**<u>वादीतर्फे विधिज्ञ श्री.एम.डी.कुंटे यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

मी दावा मिळकतीचे सन १९५७ पासूनचे कागदपत्र पाहिलेले नाहीत. दावा मिळकतीचे मुळ मालक देवू कृष्णा गावडे हे होते. देवू कृष्णा गावडे हे दावा मिळकतीचे मालक होते हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे आहे. (आता साक्षीदारास अभिलेख देणेत आले.) साक्षीदाराने 'ड' फाईलमधील निशाणी क्र.५१ कडे असणाऱ्या बोटखताकडे निर्देशीत केलेले आहे. दावा मिळकतीचा जुना सर्व्हे नंबर मला आठवत नाही. मी दाखल केलेल्या माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापात्रामध्ये नमुद वंशावळीमध्ये वादी किंवा त्याच्या कुटुंबाचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे कुटुंब व आमचे कुटुंब वेगवेगळे आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे वादी यांचे आजोबा यांनी रोकॉर्ड ऑफ राईटला फसवून नाव नोंद केले आहे याबाबत मी महसुल न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केलेले नाही. मी वादीचे आजोबा यानी फसवणुक केल्याबाबत हक्कज्ञापनाकरिता कुडाळ न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये वादी यांनी त्यांचे गाळे व दुकाने बांधलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये 'वादीने मला न जुमानता गाळे बांधलेले आहेत', असा उल्लेख केलेला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदरचे गाळे पाडून मिळणेकरिता मी दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची नक्कल मी प्रस्तुतकामी हजर केलेली आहे.

**प्रश्नः–** माडयाचीवाडी येथे ईमला क्र.१४६ अ, १४६ ब, १४६ क, व १४६ ड असे ईमले आहेत.

**उत्तरः–** तो एकच ईमला आहे. त्याचे असेसमेंट करिता त्याचे भाग केलेले आहेत.

२. हे म्हणणे खरे आहे की, सदर असेसमेंटच्या कोणत्याही भागास माझे नाव नमुद नाही. साक्षीदार सांगतो की माझ्या काकांचे नाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, माडयाचीवाडी घर नं.१४६ अ मध्ये प्रतिवादी नं.४ यांचे नाव चुकीने नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा ईमला नं.१४६ ब या ईमल्यास प्रतिवादी क्र.५ अ ते ५ ई यांच्या पुर्वाधिकाऱ्यांचे म्हणजेच गणपत शंकर गावडे यांचे नाव चुकीने नमुद झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा ईमला क्र.१४६ क मध्ये प्रतिवादी क्र.६ सुमित्रा गावडे हिचे नाव चुकीने नमुद झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ईमला क्र.१४६ ड ला ताराबाई महादेव गावडे हिचे नाव चुकीने नमुद झालेले आहे. हे मला सांगता येत नाही की, ताराबाई महादेव गावडे ही मयत असून तिला प्रतिवादी क्र.४ ते ६ हेच वारस आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद व्यक्तीनी त्यांचा कब्जा वादींना स्वाधीन करण्याचे आश्वासन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दावा मिळकतीकडे कोणताही हक्क नसताना दावा मिळकतीचा काही भाग बळकावलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा केलेला आहे. दावा ईमला चिरेबंदी बांधल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला आहे. दावा ईमला बांधकामास किती खर्च आला याबाबत मी गोळाबेरीज केलेली नाही. मी बांधकामाकरिता कोणत्या दुकानातून सामान खरेदी केले, त्याचे नाव मला आता आठवत नाही. दावा मिळकतीमध्ये बांधकामाकरिता माझ्या नावे परवानगी घेतलेली नाही. साक्षीदार सांगतो की, माझे सहभागदार व माझे काकांनी परवानगी घेतलेली आहे. बांधकामाच्या परवानगीमध्ये माझ्या नावाची नोंद आहे. (आता साक्षीदारास अभिलेख देण्यात आले.) साक्षीदार याने निशाणी क्र.५८ कडील कागदपत्र दाखविले. (निशाणी ओळखीपुरती देण्यात आलेली आहे.) मी सदरचे कागदपत्र ग्रामपंचायतीमध्ये दिलेले आहे. हे मला आठवत नाही की, सदर कागदपत्रे दिल्याची पोहोच मला मिळाली आहे किंवा कसे. मला मिळाल्यास मी सादर करु शकतो.

**प्रश्नः–** सदर कागदपत्राच्या आधारे तुम्हाला दावा ईमल्याच्या बाबत कोणती परवानगी मिळाली का?

**उत्तरः–** तसा प्रश्नच आला नाही.

३. ईमला क्र.१४६ हा वडिलोपार्जित असल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. (साक्षीदारास अभिलेख देण्यात आले.) साक्षीदाराने अभिलेखातील निशाणी क्र.४३, ४४ व ४५ दाखविली. मुळ पुरुष देवू कृष्णा गावडे हे केव्हा मयत झाले हे मला सांगता येत नाही. निशाणी क्र.४३ मधील अर्जदार देवू कृष्णा गावडे हे मुळ पुरुष देवू कृष्णा गावडे यांच्या वारसांपैकी आहेत. मी अर्जदार देवू कृष्णा गावडे हे मुळ पुरुष देवू कृष्णा गावडे यांच्या वारसांपैकी आहेत हे दाखविण्याकरिता फेरफार दाखल केलेले आहेत. साक्षीदार सांगतो की, वारस रजिस्टर दाखल केलेले नाही. मुळ पुरुष देवू कृष्णा गावडे यांचा मयत दाखला माझ्याकडे नाही. मी मुळ पुरुष देवू कृष्णा गावडे यांना चार मुलगे वारस होते हे दाखवणारा वारस रजिस्टरचा उतारा दाखल केलेला नाही. सदर चार मुलांपैकी सध्या कोणीही हयात नाही. त्यांचे मयत दाखले देखिल माझ्याकडे नाहीत.

**वेळ ०५.०० p.m. झालेली असून न्यायालयात रिमांड व इतर जामीनबाबत कामकाज प्रलंबीत असल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करणेत आला.**

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(आर.जी.कुंभार)

दिनांक– ०५/११/२०२५

अति.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.